# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल क्रं.155/2011 मध्ये दि.19/12/2024 रोजी दिलेल्या आदेशानुसार **सुधारीत होर्डीग्स, फ्लेक्स बोर्ड, बॅनर्स, पोस्टर्स इ . धोरण व कार्यपद्धती** 2024 (**Hoardings, Banner, Flex, Posters, etc revised Policy & standard operating procedure (SOP)**) 2024

1. **प्रस्तावना**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल PIL/155/2011 मध्ये दि.19/12/2024 रोजी दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने मा. आयुक्त तथा संचालक नगरपरिषद संचालनालय यांनी दि. 20/12/2024 रोजी सूचना निर्गमित केलेल्या आहेत. सदर आदेशानुसार प्रचलित धोरण व कार्यपध्दती (SOP) चे अतिरिक्त आयुक्त यांचे अध्यक्षतेखालील उपायुक्त,संबंधित विभागप्रमुखांच्या समिती बैठकीमध्ये चर्चा,विचार,विनिमय करून पुर्नविलोकन करून सादर केलेल्या मसुदयास **सुधारीत होर्डीग्स, फ्लेक्स बोर्ड, बॅनर्स, पोस्टर्स इ . धोरण व कार्यपद्धती** 2024 ( **Hoardings, Banner, Flex boards, Posters, etc revised Policy and standard operating procedure (SOP)**) 2024 असे संबोधण्यात येऊन सदर **सुधारीत धोरण व कार्यपद्धती** अंमलात आणण्यास मा. प्रशासक (मा. महासभा ) ठराव क्रं.89 दिनांक 31/12/2024 अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

2. **संदर्भ**

2.1 मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका मध्ये 155/2011 दि. 31/1/2017, दि. 09/10/2024, 18/11/2024, दि. 19/12/2024 रोजी दिलेले आदेश.

2.2 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 244,245

2.3 महाराष्ट्र मालमत्ताच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम 1995

2.4 महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग दि. 09/05/2022, च्या प्रसिद्ध अधिसूचना अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, 2022

2.5 महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. याचिका 3017/प्र.क्र. 130/ नवि-22, दि. 14/03/2017 आणि दि. 14/11/2022.

2.6 मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय आदेश दि. 20/12/2024.

2.7 मे **कौ.ठराव नं.** 7. **दि.** 24/05/2016 यापूर्वी परवानगी देणेत आलेले रोड डिव्हायडर वरील तसेच अन्य फलक परवानगी रद्द करून केवळ शासकीय जाहीराती, नगरपरिषदे मार्फत जाहीरात फलक लावण्यास मान्यता प्राप्त झालेली आहे. विनापरवाना जाहीरात केलेस जाहीरात बोर्डधारक व जागामालक या दोघांवर फौजदारी कारवाई करण्याबाबत ही मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

2.8 **मे. कौ.ठराव नं.270 दि.05/02/2019** खाजगी स्वत:चे मालकीच्या जागेत यापूर्वी दिलेले परवाने वगळता अन्य नवीन परवाने देण्यास मनाई केली आहे.

2.9 **मा. प्रशासक ठराव (मा. महासभा) नं.94 दि.15/03/2024** केवळ निवडणूकीच्या प्रचारासाठी संधी उपलब्ध करणेच्या दृष्टीने केवळ पक्ष कार्यालय / तात्पुरते पक्ष कार्यालय या ठिकाणी तसेच

रितसर नाहरकत घेऊन आयोजित केलेल्या सभांच्या ठिकाणी होर्डींग, फ्लेक्स, बॅनर, बोर्ड व तत्सम बाबी लावावयाचे झाल्यास मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. 155/2011 मध्ये दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करुन तसेच आदर्श आचारसंहितेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणेच्या अटीस अधिन राहुन, तसेच उक्त कामी विहीत अटी व शर्तीस अधिन राहुन विहित अटींसह मान्यता देण्यात आली आहे.

2.10 **शब्द व शब्दप्रयोग अर्थ:** या सुधारीत धोरण व कार्यपद्धती मध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, उक्त अधिनियमाप्रमाणे अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच अर्थ असतील.

## 3. नव्याने जाहिरात,होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स, पोस्टर लावण्यास प्रतिबंध

3.1 उक्त नमूद संदर्भीय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 244,245, महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम 1995, महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, 2022 मा. उच्च न्यायालयाचे जनहित याचिका क्रं.155/2011 मधील संदर्भिय आदेश, नगरविकास विभागाकडील आदेश, उक्त ठरावांचे अवलोकन करून होर्डिंग बॅनर लावण्याबाबत यापुर्वी घेतलेल्या निर्णयामुळे शहरातील होर्डिंग, बॅनर लावण्याची संख्या नगण्य असून अपवादात्मक अत्यल्प प्रमाणात अनाधिकृत बॅनर लावले जात असून त्यावर देखिल नियंत्रण ठेवणेच्या दृष्टीने व्यापक जनहित डोळ्यासमोर ठेवून सदर जाहिरात धोरण पुढील नमूद केलेल्या मुद्द्यांसह अटींसह सुधारीत करण्यात येत आहे.

3.2 महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, 2022 च्या तरतूदी लागू असणाऱ्या सर्व जाहिरात फलकांना सदर जाहिरात धोरण लागू राहील.

3.3 या सुधारीत जाहिरात धोरणाव्दारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 244, 245, महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम 1995, महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम, 2022 च्या तरतूदी लागू असणाऱ्या जाहिरातीपैकी **अनुज्ञेय करण्यात आलेल्या पुढील नमूद जाहिराती वगळता नव्याने जाहिरात,होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स, पोस्टर इचलकरंजी महानगरपालिका क्षेत्रामध्ये लावण्यास प्रतिबंध** करण्यात येईल.

## 4. अनुज्ञेय करण्यात आलेल्या खालील नमूद जाहिराती

4.1 शासन मार्फत प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या लोकोपयोगी योजना व अन्य कार्यक्रमांच्या जाहिराती, होर्डीग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इ, व तत्सम जाहीराती ,

4.2 शासन मार्फत प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या अन्य जाहिराती, होर्डीग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इ, व तत्सम जाहीराती

4.3 महानगरपालिकेमार्फत प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या योजना व अन्य कार्यक्रमांच्या, सुविधांच्या व तत्सम जाहिराती, होर्डीग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इ तसेच डिजिटल जाहिराती.

4.4 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येणाऱ्या डिजिटल जाहिरात फलकावर प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या वाणिज्य स्वरुपाच्या महानगरपालिकेस उत्पन्न मिळवून देणाऱ्या जाहिराती. (LED Display बोर्ड, डिजिटल जाहिरात फलकावर प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या डिजिटल जाहिराती बाबत मनपाचे स्वताचे LED Display बाबत पुढील धोरण करण्यात येईल.)

4.5 महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम आणि नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येणाऱ्या बस थांब्याच्या वरच्या टोकावर आणि मागील बाजूस, प्रकाशीत अथवा पार्श्वप्रकाशमान जाहिराती (महानगरपालिकेने निश्चित केलेला जादा आकार /अधिमुल्य सह)

4.6 मोफत सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या एनजीओ यांच्या सामाजिक संदेश देणाऱ्या, सामाजिक उपक्रम राबविण्याच्या कार्यक्रमाच्या जाहिराती,

4.7 मोफत सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या एनजीओ यांच्या सामाजिक संदेश देणाऱ्या, सामाजिक उपक्रम राबविण्यासाठी निधी संकलनासाठीच्या कार्यक्रमस्थळी कमाल तीन बोर्ड /जाहिराती,

4.8 दुकाने, आस्थापना इ. च्या नामफलकासाठी प्रकाशित / अप्रकाशित कमाल 3 x 6फुट या मर्यादेतील केवळ एक नामफलक.

4.9 दुकाने, आस्थापना इ. च्या नामफलकासाठी प्रकाशित / अप्रकाशित स्वत: च्या जागेत वाहतुकीस अडथळा येणार नाही अशा ठिकाणी कमाल 1 x 2 फुट या मर्यादेतील केवळ एक नामफलक / लॉलीपॉप.

4.10 राजकीय पक्ष कार्यालय परिसरात राजकीय पक्षाची धोरणे, वचननामा इ. दर्शविणारी प्रति पक्ष कार्यालय एक फ्लेक्स जाहिरात बोर्ड. (योग्यत्या अटी शर्तीसह)

4.11 निवडणूक काळात तात्पुरते पक्ष कार्यालय/ प्रचार सभा परिसरात प्रति पक्ष कार्यालय / अपक्ष उमेदवार कार्यालय एक फ्लेक्स जाहिरात बोर्ड. (योग्यत्या अटी शर्तीसह)

4.12 निवडणूक काळात नि.नि.अ. परवानगी प्राप्त प्रचार सभा परिसरात प्रति प्रचार सभा तात्पुरते कमाल पाच फ्लेक्स जाहिरात बोर्ड. (योग्यत्या अटी शर्तीसह)

4.13 मनपा क्षेत्रात विविध कामासाठी तसेच विविध सणांच्या दरम्यान तात्पुरते मंडप तसेच बूथ उभारले जातात. सदर मंडप/ बुथमध्ये / परिसरात लावण्याच्या कमाल दोन फ्लेक्स जाहिरात बोर्ड.

4.14 फिरती वाहने, वाहने व सायकलींवर करण्यात येणाऱ्या जाहिरातीं.

4.15 खाजगी जागेतील काचेच्या आतमध्ये लावण्यात येणाऱ्या रस्त्यावरून दिसणाऱ्या जाहिराती तसेच डिजीटल जाहिराती.

4.16 चल चित्रपट, रंगभूमीवरील नाटक, इतर प्रयोग या प्रकारच्या विविध कला क्षेत्रातील कार्यक्रमाच्या प्रसिध्दीसाठी रस्त्यावरून नजरेस पडणाऱ्या एकाच मालमत्तेवर प्रदर्शित करावयाच्या कमाल 3 बोर्ड जाहिराती.

4.17 सदर सुधारीत धोरण व कार्यपद्धती मध्ये नमुद अटी- शर्ती प्रमाणे पुर्वी मान्यता प्रदान केलेल्या 11 जाहिरात धारकांव्दारे विहीत अटींची पुर्तता केल्यास सदर 23 ठिकाणी जाहिराती लावण्यास परवाना नुतनीकरण करण्याच्या जाहिराती.

5. **परवानगी /परवाना देण्याची प्रक्रिया व कार्यपद्धती :- सदर सुधारित धोरण मुददा क्रमांक 4 मध्ये अनुज्ञेय करण्यात आलेल्या नवीन (प्रारंभिक) जाहिरात फलक उभारणीसाठी परवानगी /परवाना देण्याची प्रक्रिया व कार्यपद्धती**

5.1 **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद**: कलम 244: आकाशचिन्हांबाबत विनियम बाबतच्या तरतूदीनुसार महानगरपालिका आयुक्त यांची परवानगी अनिवार्य आहे. जर कोणतेही आकाशचिन्ह या कलमाच्या तरतुदीविरुद्ध लावण्यात, आले असेल किंवा परवानगी कालावधी संपला असेल किंवा अशी परवानगी निरर्थक झाली असेल तर, त्या जमिनीच्या, इमारतीच्या किंवा बांधकामाच्या मालकास किंवा भोगवटादारास ते खाली उतरवून काढून टाकण्याविषयी आदेश देण्याचे आयुक्तांकडे अधिकार निहीत आहेत.

5.2 महाराष्ट्र मालमत्ताच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम 1995 मधील तरतूदी

5.3 **नियम, 2022 तरतुद** महाराष्ट्र महानगरपालिका [आकाश-चिन्हे (स्काय-साईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) **नियम**, 2022 अन्वये कोणतेही अभिकरण, व्यक्ती, सक्षम प्राधिकरणाची लेखी स्वरूपातील परवानगी असल्याशिवाय, जाहिरात फलक (होर्डिंग), भित्तीपत्रके, आकाश-चिन्ह (स्काय-साईन), किऑस्क, भित्तीचित्रे (वॉल पेंटींग), फुगे उभारणार नाही, दाखविणार नाही, लावणार नाही, प्रस्थापित करणार नाही किंवा प्रदर्शित करणार नाही. या नियमांमध्ये आणि त्या अधिनियमांच्या तरतुदींमध्ये नमूद केलेल्या सर्व निकषांची पूर्तता करीत असल्याबाबत त्याची खात्री पटल्याखेरीज अशी परवानगी दिली जाणार नाही.

5.4 सुधारित धोरण मुददा क्रमांक 4 मध्ये अनुज्ञेय असलेल्या जाहिरात आपल्या जमिनीवर किंवा जागेवर जाहिरात प्रदर्शित करण्याची किंवा जाहिरात फलक लावण्याची इच्छा असलेल्या इतर कोणत्याही अभिकरणास, व्यक्तीस, संस्थेस, या नियमांमध्ये अंतर्भूत केलेल्या तरतुदींनुसार आणि त्या अधिनियमाच्या संबंधित कलमांन्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडून वैध परवाना प्राप्त करता येईल.

5.5 जर तीन महिन्यांच्या आत जाहिरात फलक (होर्डिंग) उभारला नाही तर, दिलेली परवानगी रद्द रद्दबातल होईल. अर्जदार असलेल्या कोणत्याही अभिकरणास, या बाबतीत निर्धारित कार्यपध्दतीचा अवलंब करून नव्याने अर्ज करता येईल.

5.6 सुधारित धोरण मुददा क्रमांक 4 मध्ये अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही प्रकारचा फलक अथवा जाहिरात अथवा आकाश-चिन्ह अथवा जाहिरात फुगा अथवा किऑस्क इत्यादी उभारण्यास इच्छुक असणारे कोणतेही अभिकरण, त्याबाबत परवानगी मिळविण्यासाठी, प्रति अर्ज विहित संस्करण फी सह, यासोबत जोडलेल्या नमुना-क मध्ये अर्ज करील. सक्षम अधिकाऱ्याने अभिकरणाच्या प्रस्तावित फलकाच्या उभारणी साठी योग्य त्या कागदपत्रांची पडताळणी करून मान्यता दिल्यावर मनपा अभिकरणास सदर फलक परवाना फी चे चलन देईल. त्याचा भरणा अभिकरणाने पंधरा दिवसांच्या आत भरणे बंधनकारक आहे. त्यानंतर मान्यता प्राप्त संरचनेची (स्ट्रक्चर) उभारणी केल्यावर मनपा सक्षम अधिकाऱ्याने तपासणी करून त्याचे स्वीकृत पत्र दिल्यावरच अभिकरणाला सांकेतीक क्रमांक प्रदान करण्यात येईल. त्या सांकेतीक क्रमांकासह सदर अधिकृत संरचनेवर अधिकृत जाहिरात लावता येईल. त्यानंतर अभिकरणास सदर फलकासाठी परवाना (फॉर्म-सी) दिला जाईल. यापैकी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास सदर प्रस्ताव नोटीस देऊन रद्द करण्यात येईल.

5.7 **अर्जासोबत पुढील दस्तऐवज जोडण्यात येतील**

5.7.1 जिच्यावर जाहिरात प्रदर्शित करण्याचे प्रस्तावित असेल त्या जमिनीच्या/इमारतीच्या मालकाकडून घेतलेले ना-हरकत प्रमाणपत्र

5.7.2 जिच्यावर जाहिरात प्रदर्शित करण्याचे प्रस्तावित असेल त्या जमिनीच्या/ इमारतीच्या संदर्भात महानगरपालिकेच्या मालमत्ता कर, पाणीपटटीची थकबाकी व इतर अनुज्ञेय रक्कमेची थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र आणि तशा आशयाचे शपथपत्र

5.7.3 ज्या जमिनीवर जाहिरात करावयाची आहे ती जमीन महानगरपालिका, शासन, बंदर विश्वस्त व्यवस्था, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण इत्यादींसारख्या सार्वजनिक प्राधिकरणांकडून भाडेपट्टयाने देण्यात आलेली असेल तर, पट्टाकाराचे (leassor) ना-हरकत प्रमाणपत्र देखील आवश्यक आहे

5.7.4 इमारतीच्या गच्चीवरील फलकाबाबत, सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे किंवा अन्य बाबतीत इमारतीतील सभासदांपैकी किमान २/३ सहमतीने दिलेले ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असेल

5.7.5 सहकारी गृहनिर्माण संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र असेल तर, सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीमध्ये रीतसर मंजूर केलेल्या ठरावाची प्रमाणित केलेली प्रत

5.7.6 प्रस्तावित जाहिरात उभारण्याचे ठिकाण दर्शविणाऱ्या आधारभूत नकाशांच्या संरचना अभियंत्याने साक्षांकित केलेल्या दोन प्रती

5.7.7 प्रस्तावित जाहिरात स्थळाची आखणी व रंगयोजना आणि त्याचे नेमके स्थान दर्शविणारे रेखाचित्र तसेच बाह्य प्रकाश व्यवस्थेसह संगणक निर्मित संकल्पचित्र यांच्या दोन प्रती

5.7.8 जाहिरात फलकावर प्रसिध्द करावयाच्या मजकुराची स्वसाक्षांकित प्रत

5.7.9 प्रस्तावित जाहिरात स्थळावरील प्रस्तावित फलकाच्या चिन्हांकनासह त्या स्थळाची 10X8 इंच आकाराची दोन छायाचित्रे

5.7.10 त्या स्थानामध्ये 40 मीटरच्या आत एकाच रांगेत कोणतीही झाडे किंवा अन्य कोणताही फलक अस्तित्वात असल्याचे, त्यांच्या आकारासह दर्शविणाऱ्या, त्या स्थानाच्या नकाशाच्या 2 प्रती

5.7.11 पोलीस (वाहतूक) विभागाच्या सक्षम अधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र

5.7.12 आवश्यकता असल्यास महानगरपालिकेचा उद्यान विभाग यांच्याकडून सक्षम प्राधिकारी ना-हरकत प्रमाणपत्र मागवतील

5.7.13 लायसन्स प्राप्त संरचना अभियंत्याने मान्य केलेला संरचनात्मक मांडणी किंवा आराखडा

5.7.14 ज्या इमारतीवर जाहिरात उभारावयाची असेल त्या इमारतीचे, लायसन्स प्राप्त संरचना अभियंत्याचे संरचना-मजबुती प्रमाणपत्र आणि फलकाच्या संरचनेचे संरचना-मजबुती प्रमाणपत्र

5.7.15 महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, 2017 अन्वये नोंदणी प्रमाणपत्र. (Shop Act Certificate) व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र (General Service Tax Certificate)

5.8 **व्यवसायाच्या जागेत रोषणाई केलेले फलक, प्रकाशित जाहिरात फलक, निऑन फलक इ. माध्यमांतून जाहिरात परवानगी मिळविण्याकरिताच्या अर्जासोबत सादर करावयाचे दस्तऐवज**

5.8.1 व्यवसायाच्या जागेची ना-हरकत प्रमाणपत्र भाडे-पावती किंवा त्या जागेच्या कायदेशीर व प्रत्यक्ष ताब्यासंबंधातील अन्य कोणताही दस्तऐवज किंवा महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, 2017 अन्वये केलेल्या नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

5.8.2 जाहिरात फलकाचा आकार, तसेच त्यांवर प्रदर्शित करावयाच्या मजकुराचा तपशील यांसह त्या फलकाचे रेखाचित्र

5.9 **सदर सुधारित धोरण मुद्दा क्रमांक 4 मध्ये अनुज्ञेय करण्यात आलेल्या तात्पुरती जाहिरात परवानगीकरिता अर्ज** (क) तात्पुरती जाहिरात परवानगीकरिता, जसे की फलक, कमानी, पथनाट्यप्रदर्शन, इमारत वेष्टने, जाहिरात फुगे इत्यादींच्या माध्यमातून तात्पुरती जाहिरात करण्याकरिताचा अर्ज, सर्वसाधारणत विहित अशा संस्करण फी सह विहीत नमुन्यात (नमुना-क) सक्षम प्राधिकाऱ्याकडे करावा. तात्पुरत्या जाहिरात फलकासाठी महानगरपालिकेने विनिर्दिष्ट केलेल्या जागांवर तीन दिवसांपेक्षा अधिक नाही व 6' लांबी 3' उंची किंवा 8' लांबी 3' उंची किंवा 8' लांबी × 6' उंची पेक्षा अधिक आकाराचे नसलेल्या फलकांनाच परवानगी देण्यात येईल. तसेच तात्पुरती जाहिरात फलकानी अस्तित्वात असलेले कायमस्वरूपी जाहिरात फलक दिसण्यामध्ये अडथळा करता येणार नाही.

5.10 **सदर सुधारित धोरण मुददा क्रमांक 4 मध्ये अनुज्ञेय करण्यात आलेल्या तात्पुरती जाहिरात परवानगीकरिता अर्जाबरोबर पुढील दस्तऐवज जोडण्यात येतील.**

5.10.1 मिळकतीच्या/जमिनीच्या मालकाच्या/महानगरपालिकेच्या किंवा अन्य सार्वजनिक प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे ना-हरकत प्रमाणपत्र

5.10.2 जिच्यावर जाहिरात प्रदर्शित करण्याचे प्रस्तावित असेल त्या जमिनीच्या/ इमारतीच्या संदर्भात महानगरपालिकेच्या मालमत्ता कर, पाणीपटटीची थकबाकी व इतर अनुज्ञेय रक्कमेची थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र आणि तशा आशयाचे शपथपत्र

5.10.3 इमारतीच्या गच्चीवरील फलकाबाबत, सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे किंवा अन्य बाबतीत इमारतीतील सभासदांपैकी किमान २/३ सहमतीने दिलेले ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक असेल

5.10.4 जाहिरात फलकावर प्रसिध्द करावयाच्या मजकुराची स्वसाक्षांकित प्रत

5.10.5 जाहिरातीद्वारे सार्वजनिक नितिमत्ता आणि सभ्यता यांचे उल्लंघन होणार नाही, या फलकामुळे सार्वजनिक शांतता व कायदा सुव्यवस्था बिघडणार नाही याची दक्षता घेण्यात आली आहे त्यानंतरही काही गैरप्रकार झाल्यास त्याची जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील याबाबतचे शपथपत्र

5.10.6 पोलीस (वाहतूक) विभागाच्या सक्षम अधिकारी यांचे ना-हरकत प्रमाणपत्र

5.11 अभिकरणाकडून वर्षातील 15 दिवसांच्या कालावधीकरिता, महानगरपालिकेकडून जसजसे निर्देश देण्यात येईल त्याप्रमाणे एखादा नागरी संदेश जो सार्वजनिक हितास्तव, प्रक्षेपित करणे अनिवार्य असेल, त्यासाठी जाहीरात फलक रिकामा असल्यास / नजिकच्या कालावधीत रिकामा होणार असेल, ज्यासाठी कोणतेही शुल्क देय असणार नाही.

5.12 **सदर सुधारित धोरण मुददा क्रमांक 4 मध्ये अनुज्ञेय करण्यात आलेल्या पुर्वी मान्यता प्रदान केलेल्या सदर 11 जाहिरात धारकाना परवानगी देण्याची प्रक्रिया व कार्यपद्धती** 23 ठिकाणी जाहिराती लावण्यास पुर्वी मान्यता प्रदान केलेल्या सदर 11 जाहिरात धारकाना परवानगी देण्याची प्रक्रिया व कार्यपद्धती मध्ये अटी- शर्ती प्रमाणे अनुज्ञेय होर्डिंग्ज जाहिराती. नैसर्गिक न्यायतत्त्वाचे पालन करण्याच्या उददेशाने संबंधितांना सदर जाहिरात धोरणातील अटी शर्तीप्रमाणे पूर्तताबाबत 21 दिवसांच्या मुदतीची नोटीस काढण्यात यावी. सदर धोरणातील त्यांना लागू असणाऱ्या सर्व अटी शर्तीचा उल्लेख, सदर अटी शर्तीची पूर्तता केली नाही तर त्यांचा जाहिरात परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात येईल याचाही सदर नोटीस मध्ये उल्लेख करण्यात यावा. सदर नोटीसमधील अटी शर्तीचे विहित मुदतीत अनुपालन केलेचे संबंधित जाहिरात धारकानी नोडल अधिकारी तथा उपायुक्त यांच्याकडे आवश्यक कागदपत्रे/फोटो जोडून नमुन्यातील विहित शपथ दाखल केले नाही तर सदर पूर्वीच्या जाहिरात परवाना अवैध ठरविण्यात येऊन तसे नोडल अधिकारी तथा उपायुक्त यांनी घोषित करून घोषित केल्यापासून 48 तासांच्या आत सदर जाहिराती काढून टाकून त्याचा खर्च संबंधित जाहिरातदार/ जाहिरात लावलेल्या जागेचे / इमारतीचे मालक यांच्याकडून जमीन महसूल/ मालमत्ता कर थकबाकी वसुलीच्या तरतुदी नुसार वसूल करण्यात येईल.

5.13 शासकीय विभाग / प्राधिकरणे / महामंडळे (उदा, भारतीय रेल्वे, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, म्हाडा. महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको, भारतीय विमानतळ प्राधिकरण, महाराष्ट्र मेरिटाइम बोर्ड, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लिमिटेड, शासकिय पेट्रोल पंप, अन्य प्रशासकिय संस्था तसेच इतर तत्सम संस्था इ.) यांच्या हद्दीत उभारण्यात आलेल्या (होर्डिंग्स) जाहिरात फलकामुळे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत दुर्घटना होऊ शकते अशा आशयांचे जाहिरात फलकांसाठी संबंधित प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी महानगरपालिकेकडे आवश्यक कागदपत्रे, शपथपत्र व शासनमान्यता संस्थेकडील / मनपा कडील नोंदणीकृत संरचना तज्ञांचे (स्ट्रक्चरल इंजिनियर्स) कडील स्ट्रक्चरल ऑडीट प्रमाणपत्र दाखल करणे बंधनकारक राहील. तथापि अशा शासकिय प्राधिकरणाच्या वतीने वाणिज्य करणासाठी खाजगी व्यक्ती, संस्थां याचेमार्फत केले जाणाऱ्या उद्योग, व्यापार इ. साठी करण्यात येणाऱ्या जाहिरातींसाठी परवानगी घेणे, तसेच लागू असणारे शुल्क मनपा कार्यालयामध्य जमा करणे बंधनकारक राहील.

5.14 **अर्ज निकालात काढण्याची कार्यवाही**

5.14.1 सदर सुधारित धोरण मुददा क्रमांक 4 मध्ये अनुज्ञेय करण्यात आलेल्या अर्ज सादर करतेवेळी, विहित नमुन्यात भरलेल्या अर्जाची व त्यासोबत जोडलेल्या दस्तऐवजांची सक्षम प्राधिकाऱ्याकडून जो अर्ज स्वीकारील, त्याच्याकडून छाननीपूर्व छाननी करण्यात येईल. जर अर्ज सर्व बाबतीत परिपूर्ण असल्याचे आढळून आले तरच, केवळ तो संस्करण फीसह स्वीकारण्यात येईल. म्हणून, अर्जदारांना सर्व बाबतीत परिपूर्ण भरलेला अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

5.14.2 मिळालेल्या प्रत्येक अर्जाची पोचपावती देण्यात येईल आणि त्यावरील निर्णय, अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून 15 दिवसांच्या आत (तात्पुरत्या जाहिरातींसाठी सात दिवसांच्या आत) अर्जदाराला सक्षम प्राधिकाऱ्याकडून लेखी कळविण्यात येईल.

5.14.3 सक्षम प्राधिकाऱ्याकडून परवानगी देण्यात आल्यावर, नमुना- "क" मधील परवाना देण्यात येईल.

5.14.4 एखाद्या जाहिरातीकरीता दोन वर्षांहून (तात्पुरत्या जाहिरातीसाठी निवडणूकीसाठी कमाल पंचेचाळीस दिवस कालावधी व अन्य बाबत सात दिवस कालावधी) अधिक होणार नाही इतक्या कालावधीसाठी प्रारंभिक परवानगी देता येईल व नंतर सदर नियमावलीनुसार दर दोन वर्षांनी त्याचे नुतनीकरण करण्यात येईल.

5.15 **सदर सुधारित धोरण मुददा क्रमांक 4 मध्ये अनुज्ञेय करण्यात आलेल्या परवानगी/परवाना साठी सक्षम प्राधिकारी:** उक्त अधिनियमातील तरतुदी नियमातील तरतुदीनुसार या धोरणानुसार

अनुज्ञेय करण्यात आलेल्या आलेल्या होर्डिंग बाबतच्या जाहिरातींसाठी आवश्यकतेप्रमाणे परवानगी/ परवाना देण्याचे अधिकार संबंधित उपायुक्त व या धोरणानुसार अनुज्ञेय करण्यात आलेल्या आलेल्या तात्पुरत्या फलक, फ्लेक्स बॅनर इ.साठी परवानगी/ परवाना सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती यांना अधिनियमातील तरतीनुसार आवश्यकते आयुक्तांच्या पुनरिक्षणास अधीन राहून सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करून अधिकार प्रदान करण्यात येतील.

5.16 **कारवाई इ. साठी सक्षम प्राधिकारी:** या सुधारित होर्डिंग बॅनर पोस्टर इत्यादी बाबतच्या धोरण व कार्यपद्धती च्या अनुषंगाने उपायुक्त तथा मनपा शहर स्तरीय नोडल अधिकारी, सहाय्यक आयुक्त तथा वॉर्ड स्तरीय नोडल अधिकारी, आणि प्रभाग अधिकारी तथा वॉर्ड स्तरीय नोडल अधिकारी, सहा. नोडल अधिकारी यांना (परवानगी/ परवाना देण्या व्यतिरिक्त ) अन्य सर्व कार्यवाही, कारवाई,दंड वसूली, गुन्हा दाखल करण्याचे इ. आयुक्तांच्या पुनरिक्षणास अधीन राहून पार पाडण्याचे अधिकार सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करून प्रदान करण्यात येतील.

5.17 सक्षम प्राधिकारी असा परवाना देताना, अधिनियम, नियमावलीमधील तरतुदी विचारात घेईल, संपूर्ण कायदेशीर चौकटीत राहून निर्णय घेईल.

5.18 **जाहिरात फलक पुढील परिस्थितीत लावण्याची परवानगी दिली जाणार नाही**

5.18.1 सदर सुधारित धोरण मुददा क्रमांक 4 मध्ये अनुज्ञेय नसलेल्या जाहिराती

5.18.2 वाहन चालकांच्या डोळ्यावर तिरीप येईल इतक्या प्रखरतेची रोषणाई केलेला जाहिरात फलक प्रदर्शित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

5.18.3 दोन किंवा दोनपेक्षा जास्त रस्ते जेथे एकत्र मिळतात अशा ठिकाणी, पोचमार्गाच्या थांबारेषेपासून पुढील / समोरील बाजूस 25 मीटर इतक्या अंतराच्या आत, जमिनीवर उभारलेल्या जाहिरात फलकांची दर्शनी बाजू / जाहिरात प्रदर्शित केलेली बाजू समोर येईल, अशा प्रकारे कोणताही जाहिरात फलक प्रदर्शित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

5.18.4 सार्वजनिक खुली जागा म्हणजे मनोरंजनाची मैदाने, क्रीडांगणे, उद्याने, बगिचे यामध्ये कोणताही जाहिरात फलक लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.

5.18.5 महानगरपालिकेत सध्या अस्तित्वात असलेल्या जाहिरात फलकांसमोर उंच जातीची झाडे लावण्याची परवानगी देणार नाहीत.

5.18.6 कोणत्याही रस्त्यावर कोणतेही फिरते जाहिरात प्रदर्शनी वाहन उभे करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

5.18.7 पुरातत्वीय, वास्तूशास्त्रीय, सौंदर्यशास्त्रीय आणि ऐतिहासिक व वारसागामी महत्व असलेल्या इमारतींवर कोणताही जाहिरात फलक लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.

5.18.8 नदी पात्रात, तलावात, कॅनॉल आणि जलाशयांत कोणताही जाहिरात फलक लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.

5.18.9 इमारतीच्या प्रकारावर/गच्चीवर जाहिरात फलकाची उंची 20 फूटापेक्षा अधिक असता कामा नये.

5.18.10 वाहतूक बेटाच्या सभोवती आणि संकेत संगमाच्या (सिग्नल जंक्शन) ठिकाणी पोचमार्गाच्या थांबारेषेपासून पुढील / समोरील बाजूस 25 मीटर इतक्या अंतराच्या आत, जमिनीवर उभारलेल्या जाहिरात फलकांची दर्शनी बाजू / जाहिरात प्रदर्शित केलेली बाजू समोर येईल, अशाप्रकारे कोणताही जाहिरात फलक लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.

5.18.11 ज्या जाहिरातींमुळे कोणत्याही परिवास्तूच्या उजेडास किंवा वायूवीजनास अडथळा होईल अशी तेथील रहिवाश्यांची तक्रार आल्यास जाहिरात फलक (होर्डिंग) लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.

5.18.12 अधिनियमाच्या आणि नियमांच्या इतर तरतुदींना अधीन राहून, कोणत्याही इमारतीच्या निर्गम भिंतीशिवाय अन्य भिंतीवर, वेष्टन निऑन /डिजीटल जाहिरातींव्यतिरिक्त कोणतेही जाहिरात फलक लावण्याची परवानगी दिली जाणार नाही.

5.18.13 जाहिरात फलकांना रोषणाई करण्यासाठी डिझेल जनित्र संच (जनरेटर) वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही, कारण त्यामुळे ध्वनिप्रदुषण आणि वायू प्रदुषण निर्माण होते.

5.18.14 रस्त्याच्या पृष्ठभागावर 40 फुट पेक्षा अधिक उंचीचे जाहिरात फलक उभारले जाणार नाहीत.

5.18.15 पदपथावर आणि सार्वजनिक रस्त्यावर कोणताही जाहिरात फलक किंवा जाहिरात प्रदर्शित करण्यात येणार नाही.

5.18.16 जेथे पदपथ नसेल तेथे सार्वजनिक रस्त्यावर कोणताही जाहिरात फलक प्रक्षेपित केला जाणार नाही.

5.18.17 एकावर दुसरा याप्रमाणे दोन्ही जाहिरात फलक या नियमावलीतील तरतुदींनुसार असल्याखेरीज परवानगी दिली जाणार नाही.

5.18.18 भित्ती चित्रणाद्वारे कोणतीही जाहिरात प्रदर्शित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

5.18.19 विहित आकाराहून मोठ्या आकाराच्या जाहिरात फलकांना परवानगी देण्यात येणार नाही.

5.18.20 एकत्रित स्वरूपातील जाहिरात फलक या नियमावलीतील तरतुदींनुसार असल्याखेरीज अनुमती दिली जाणार नाही.

5.18.21 जाणाऱ्या, येणाऱ्या किंवा दोनमार्गी वाहनांना वाहतूक करण्यामध्ये अडवणूक होईल अथवा मार्ग दिसण्यामध्ये अडथळा निर्माण होईल अशा पध्दतीने व अशा ठिकाणी कोणताही जाहिरात फलक लावणे.

5.18.22 सुर्योदय किंवा सुर्यास्त पाहण्यासाठी असलेल्या ठिकाणाहून ते पाहण्यासाठी अडथळा निर्माण होईल असा कोणताही जाहिरात फलक लावणे.

5.18.23 ज्या इमारतीचे स्थैर्य प्रमाणपत्र (stability certificate) नाही अशा इमारतींवर जाहिरात फलक लावणे.

5.18.24 ज्या इमारतीबाबत अधिनिमयान्वये किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, 1966 अन्वये महानगरपालिका स्तरावर अथवा मा. न्यायालयात कारवाई प्रलंबित असेल किंवा ज्या इमारतीच्या मालकाला कायदेशीररित्या काम थांबवा नोटीस बजावण्यात आली असेल, अशा इमारतीवर जाहिरात फलक लावणे.

5.18.25 जी इमारत (अंशतः किंवा पूर्णतः) धोकादायक म्हणून घोषित करण्यात आली असेल अथवा कायद्यान्वये जिला अशा प्रकारची नोटीस बजावण्यात आली असेल, अशी इमारत.

5.18.26 ज्यावरील जाहिरातीद्वारे सार्वजनिक नितिमत्ता आणि सभ्यता यांचे उल्लंघन होण्याचा संभव आहे असा जाहिरात फलक लावण्यास परवानगी देण्यात येणार नाही. अशी जाहिरात प्रदर्शित केल्याने सार्वजनिक नितिमत्ता व सभ्यता यांच्या प्रमाणकांचा भंग होईल अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री झाली तर, जाहिरात फलक काढून टाकण्याबाबतची लेखी सूचना प्राप्त झाल्यानंतर अभिकरण ती जाहिरात तात्काळ काढून टाकील; (दंड संहितेनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल)

5.18.27 परवानाधारकास, दारूची किंवा तंबाखू आणि तंबाखूशी संबंधित उत्पादने यांची कोणतीही जाहिरात प्रदर्शित करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

5.18.28 पादचाऱ्यांच्या मार्गामध्ये किंवा त्यांना मार्ग दिसण्यामध्ये अडथळा निर्माण होईल अशा स्वरूपातील जाहिरात.

5.18.29 अगोदर लावलेली कोणतीही जाहिरात दिसण्यामध्ये अडथळा निर्माण होईल असा जाहिरात फलक; जाहिरात फलकावर, परवानाधारकाच्या परवानगी शिवाय फ्लेक्स लावणारे आणि ज्यांचे करीता फ्लेक्स लावले आहे ते, कारवाईस पात्र ठरतील.

5.19 **रोषणाई केलेल्या/निऑन जाहिरात फलकांच्या (होर्डिंग) बाबतीत, पुढील निबंधाचे पालन करण्यात यावे**

5.19.1 प्रकाशमानाची मर्यादा ही 1 सीडी/सी एम एवढ्या प्रभाव मर्यादेपेक्षा अधिक नसावी. रात्री 11 नंतर रोषणाई चालू ठेवण्यात येऊ नये.

5.19.2 निवासी परिवास्तूमधील निऑन (फलक) हे लुकलुकणारे नसावेत.

5.19.3 निऑन फलक रात्री 11 वाजता बंद करावेत.

5.19.4 दृकश्राव्य किंवा चलचित्र डिजीटल जाहिरातींना परवानगी दिली जाणार नाही. एलइडी दर्शक पट (डिस्प्ले) हे केवळ स्थिर चित्री असावेत. किमान दर 10 सेकंदानंतर प्रतिमांमध्ये होणारा बदल अनुज्ञेय असेल.

5.19.5 एलइडी दर्शक पट (डिस्प्ले) फलकांना विद्युत विभागाच्या (महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग) व संबंधित पोलीस वाहतूक विभागाच्या परवानगीशिवाय संबंधित प्रकाशीय फलक लावण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

## 6. परवानाधारक अभिकरणाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

6.1 परवानाधारक, संरचना इमारत व जाहिरात फलक हा सौंदर्यशास्त्रदृष्ट्या संकल्पित केलेला, आखणी केलेला व सदैव यथोचितरित्या सुस्थितीत आहे याची खात्री करील. तसेच जाहिरात, फलकाची संरचना व जाहिरात फलकाची पाठीमागील बाजू गडद रंगाचा मुलामा देऊन रंगविण्यात येईल.

6.2 अश्लील किंवा कोणतेही इतर घाणेरडे आक्षेपार्ह संदेश प्रदर्शित करणाऱ्या जाहिराती प्रदर्शित करण्यात आलेल्या नाहीत, तसेच तंबाखू उत्पादने यांच्याशी संबंधित असणारे कोणतेही आक्षेपार्ह संदेश किंवा जाहिराती किंवा मद्यविषयक जाहिराती थेट किंवा तशाच प्रकारच्या दुय्यम जाहिराती, जाहिरात फलकावर प्रदर्शित करणार नाहीत (भारतीय दंड संहितेमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे) यांची परवानाधारकाने खात्री करावी.

6.3 सक्षम प्राधिकरणाच्या परवानगी शिवाय फांदया कापणे, झाडे तोडणे, सुबकरित्या कापणे छाटणे यासारख्या अपराधाकरिता महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 मध्ये सुचविलेल्या कोणत्याही दंडात्मक कारवाईबरोबरचं सक्षम प्राधिकरण, ठेवीमधील काही भाग किंवा पूर्ण ठेव समपहरण करील आणि त्याबरोबरच अभिकरणाला दिलेली परवानगी आपोआपच रद्द झाल्याचे मानण्यात येईल. दुसऱ्या वेळी प्रतिभूती ठेवीचे अंशतः होणारे समपहरण हे परवानगी आपोआपच रद्द होण्यातही होईल. परंतु धोकादायक फांद्या कापणे किंवा झाडाचा विस्तार कमी करावयाचा असल्यास सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे बंधनकारक असेल.

## 7. जाहिरातीच्या परवान्याचे नुतनीकरण

7.1 अर्जदार अभिकरण, परवान्याच्या नुतनीकरणासाठी दर दोन वर्षानंतर विहीत केलेल्या नमुना "ब" मध्ये, महानगरपालिकेने नेमलेल्या सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज करील. सक्षम अधिकाऱ्याकडून नुतनीकरणास मान्यताप्राप्त अर्जदारांना जाहिरात फी साठीची मागणी नोटीस अभिकारणास पाठविण्यात येईल. जाहिरात फलक मान्यता मिळाल्यानंतर सक्षम अधिकाऱ्याने विहित कालावधीत नमुना "क" प्रमाणे परवाना देणे बंधनकारक राहील.

7.2 नुतनीकरणाच्या अर्जाबरोबर पुढील दस्तऐवज जोडण्यात येतीलः-

7.2.1 मिळकतीच्या/जमिनीच्या मालकाच्या/महानगरपालिकेच्या किंवा अन्य सार्वजनिक प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे ना-हरकत प्रमाणपत्र;

7.2.2 कोणत्याही लायसनप्राप्त संरचना अभियंत्याचे संरचना मजबुतीचे (स्थिरतेचे) प्रमाणपत्र;

7.2.3 जाहिरातफलकाच्या 10" X 08" च्या छायाचित्राच्या दोन प्रती.

7.2.4 महापालिकेने जाहिरात फलकासाठी दिलेल्या परवाना (फॉर्म "क") प्रत.

## 8. जाहिरात परवान्याचे हस्तांतरण, परवाना रद्द आणि थकबाकी वसूल करण्याची कार्यपद्धती

जाहिरात फलकाच्या परवान्याचे सक्षम प्राधिकरणाच्या पूर्ण परवानगीने आणि पुढील बाबीस अधीन राहून, वेळोवेळी महानगरपालिकेने विहित केलेल्या हस्तांतरण शुल्काचे प्रदान केल्यानंतर, हस्तांतरण करता येऊ शकेल.

8.1 अभिकरणाची लेखी संमती, म्हणजे परवानगी/परवान्याचा धारक आणि जमीन मालकी प्राधिकरण/सहकारी संस्था.

8.2 कायदेशीर हस्तांतरणाच्या बाबतीत, मूळ मालकाच्या मृत्युचे प्रमाणपत्र आणि कायदेशीर उत्तराधिकारी किंवा कायदेशीर वारस यांचा पुरावा आणि इतर कायदेशीर वारसांकडून ना-हरकत प्रमाणपत्र.

8.3 इतर सर्व मागणीदारांसाठी क्षतिपूर्ती करण्याबाबत आयुक्तांना शपथपत्र.

8.4 विक्रीव्दारे हस्तांतरणाच्या बाबतीत, विक्रीचे दस्ताऐवज आणि खरेदीदाराकडून महानगरपालिकेच्या सर्व दाव्यांमधून क्षतिपूर्ती केल्याचे क्षतिपूर्ती बंधपत्र.

## 9. जाहिरात परवाना रद्द करण्याची कार्यपद्धती

9.1 जर अभिकरणास जाहिरात फलकाचा परवाना रद्द करावयाचे असल्यास अर्जदार,व्यक्ती संस्था, अभिकरणाव्दारे सक्षम अधिकाऱ्याकडे अर्ज करण्यात येईल.

9.2 सक्षम अधिकाऱ्याने समक्ष जागेची करून फलक काढल्याची खात्री करून सदरील फलकाबाबत थकबाकी असल्यास अशी थकबाकी भरून घेऊन सदर फलकाचा परवाना रद्द करण्यात येईल.

9.3 परवानाधारकाच्या सर्व ठेवी अटींनुसार सक्षम अधिकाऱ्याकडून तात्काळ परत केल्या जातील.

9.4 जर जाहिरातीमध्ये, या नियमाच्या तरतुदींचे अनुपालन होत असेल आणि इमारतीच्या सभोवताली असणाऱ्या मोकळ्या जागेवर जाहिरात उभारलेली असेल व त्याच्यामुळे तेथील रहिवाश्यांना अडथळा येत नसेल किंवा रहिवाशांना वाहनांची ये-जा करण्यास व पार्किंगसाठी अडथळा होत नसेल तर, त्या जाहिरातींसाठी सर्वसाधारपणे परवानगी देण्याबाबत निर्णय घेईल जाहिरात लावताना

वाहतूकीस तसेच पादचाऱ्यास त्रास होणार नाही, तसेच जाहिरातीच्या संरचनेमुळे कोणतीही दुर्घटना होणार नाही, याबाबत संबंधीत अर्जदार,व्यक्ती संस्था, अभिकरणाने (एजन्सी) दक्षता घेणे बंधनकारक राहील.

9.5 जाहिरातीच्या संरचनेमुळे झालेल्या कोणत्याही अपघातामुळे झालेल्या जीवित/मालमत्तेच्या नुकसानीस संबंधित संबंधीत अर्जदार,व्यक्ती संस्था, अभिकरण जबाबदार राहील.

9.6 जाहिरातीमुळे परिसर विद्रुप होणार नाही याची दक्षता संबंधित संबंधीत अर्जदार,व्यक्ती संस्था, अभिकरण व सक्षम प्राधिकाऱ्याने घेणे बंधनकारक राहील.

9.7 जाहिरात बोर्ड, फ्लेक्स, बॅनर, होर्डिंग परवाना ऑनलाईन देण्यात येईल.

9.8 जाहिरात फलकामार्फत जाहिरात प्रदर्शित करणारे अभिकरण, अभिकरणाची ओळख पटविणे सोईचे व्हावे यासाठी योग्य त्या आकारातील त्याच्या नावाची पट्टी आणि जाहिरातफलकाचा त्याला देण्यात आलेला अनुक्रमांक, जाहिरातफलकाच्या कोपऱ्यात दिलेल्या जागेत प्रदर्शित करील किंवा लावील. अभिकरण, परवान्याची मुदत संपण्याचा महिना व वर्षही प्रदर्शित करील.

9.9 होर्डिंग्ज, बॅनर, जाहिराती यांची प्रसिद्धी करण्यासाठी परवानगी देताना सदर होर्डिंग, बॅनर यावर परवानगी क्रमांक, ठिकाण व किती कालावधीसाठी परवानगी देण्यात आलेली आहे हे मोठ्या अक्षरांमध्ये दर्शविण्याचे बंधनकारक करण्यात यावे. किंवा होर्डीग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स ई. प्रकारच्या तात्पुरत्या जाहिराती यावर अर्जदाराचे नाव, परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण, परवानगीचा कालावधी इ. माहिती असणारा QR कोड फलकावर प्रसिध्द करण्यासाठी देण्यात येईल. तसा क्रमांक व कालावधी किंवा QR कोड फलकावर नमूद नसलेले सर्व बॅनर पोस्टर्स अनाधिकृत होर्डिंग बॅनर त्वरित काढून टाकण्यात येईल.

9.10 होर्डीग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स ई. प्रकारच्या तात्पुरत्या जाहिरातीकरिता दररोज दिल्या जाणाऱ्या परवानग्यांची माहिती, परवनागीची एक प्रत संबंधित पोलिस ठाणे यांना नियमितपणे उपलब्ध करून देण्यात येईल.

9.11 मनपा क्षेत्रात विविध कामासाठी तसेच विविध सणांच्या दरम्यान तात्पुरते मंडप तसेच बूथ उभारले जातात. या मंडप किंवा बूथ उभारण्याची परवानगी देताना त्यावर कुठलेही अनाधिकृत होर्डिंग किंवा जाहिरात लावता येणार नसल्याची, त्यासाठी स्वतंत्र परवानगी घेण्यासाठी अर्ज करण्याची अट टाकण्यात येईल.

## 10. जाहिरात शुल्क कर, भाडे आकारणी तपशील

10.1 जाहिरात बोर्ड, फ्लेक्स, होर्डिंग, इ.साठी आकारवयाचे दर, दंडात्मक कारवाईचे दर, अनाधिकृत काढून टाकणेसाठी येणारा खर्च इ.वेळोवेळी मा. महासभा निश्चित करेल त्याप्रमाणे आगाऊ जमा करणे अनुज्ञेय करण्यात आलेल्या जाहिरातींसाठी बंधनकारक राहील.

10.2 चल चित्रपट, रंगभूमीवरील नाटक, इतर प्रयोग या या प्रकारच्या विविध कला क्षेत्रातील रस्त्यावरून नजरेस पडणाऱ्या जाहिराती प्रसिद्ध करण्यासाठीं परवाना देण्यासाठी कलाक्षेत्रास चालना देण्याच्या उद्देशाने नाममात्र निश्चित करणे बाबत वेळोवेळी निर्णय घेण्यात येईल.

10.3 **व्यवसायाच्या जागेवरील नवीन अथवा प्राथमिक जाहिरात यासारख्या इतर जाहिरातींच्या परवान्याकरिता शुल्क व ठेवी**.

10.3.1 परवाना मिळाल्यावर, अभिकरण, परवानगी मंजूर झाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत सक्षम प्राधिकारी ठरवतील त्यानुसार आगाऊ रक्कम देण्यास पात्र राहील.

10.3.2 जर शुल्क विहीत करण्यात आलेल्या काळात प्रदान करण्यात आले नाही तर, 3 महिन्यांच्या विलंबाकरिता परवाना शुल्काच्या 10 टक्के रकमेइतकी आणि 6 महिन्यांच्या विलंबाकरिता 25 टक्के रकमेइतकी आपसमेळाची रक्कम देय असेल. 6 महिन्यांच्या पुढे होणाऱ्या विलंबाकरिता परवाना रद्द करण्यात येईल.

10.4 जाहिरात परवान्याच्या नुतनीकरणाच्या वेळी, अभिकरण, सक्षम प्राधिकरणाचे पृष्ठांकन घेण्याकरिता परवाना सादर करील आणि आवश्यक ते शुल्क रोख रकमेत, प्रदानादेश (पे-ऑर्डर) किंवा दर्शनी धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) किंवा इ-पेमेंट मध्ये प्रदान करील. जर प्रदान धनादेशाच्या स्वरूपात करण्यात आले असेल तर, धनादेश वटल्यानंतरच केवळ परवान्याचे नुतनीकरण करण्यात येईल. वृक्षांचे संवर्धन किंवा महनगरपालिकेच्या पदपथावरील प्रक्षेपण यामुळे प्रतिभूती ठेव अंशतः किंवा पूर्णतः समपहरण केली असेल तर, अशा समपहरणामुळे येणारी तूट ही सुद्धा परवान्याचे नुतनीकरण करण्यापूर्वी, जर तो रद्द करावयाचे ठरवले नसेल तर, भरून काढण्यात येईल.

10.5 नवीन जाहिरात फलक उभारताना, जाहिरात फलकाच्या दर्शनी बाजूला महानगरपालिकेच्या पदपथावरील 25 मीटरच्या अंतरापर्यंत अस्तित्वात असलेले वृक्ष राखणे, त्यांचे संवर्धन व संरक्षण महानगरपालिकेमार्फत करण्यासाठी आणि या शर्तीचे निष्ठापूर्वक पालन करण्यासाठी, अभिकरणाने, अस्तित्वात असलेल्या अशा प्रत्येक वृक्षासाठी प्रतिभूती ठेव म्हणून रु.2,500/- /वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे जमा करणे आवश्यक असेल. तसेच जाहिरात फलकाच्या 25 मीटर अंतरातील वृक्ष जर पुनस्थापन करायचे असतील तर सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने इतरही जातीच्या वृक्षांची पुर्नस्थापना करता येईल. अशा पुनर्स्थापनेच्या वृक्षासाठी संवर्धन शुल्क रु.2,500/- प्रत्येक वृक्षासाठी /वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे भरणे आवश्यक असेल.

10.6 जाहिरात अभिकरण (एजन्सी) जर चांगल्या दृश्य मान्यतेसाठी शाखेची छाटणी करून / जाहिरात होर्डिंग समोरील झाडाची छाटणी करण्याची इच्छा ठेवत असतील तर त्यांना उद्यान विभागाकडून ना-हरकत मिळेल. वृक्ष संवर्धन अधिनियमानुसार उद्यान विभाग झाडांच्या छाटनीसाठी विहित शुल्क वसूल करेल.

10.7 फिरती वाहने व सायकलींवर करण्यात येणाऱ्या जाहिरातींवर विहित शुल्क आकारण्यात यावे.

10.8 जाहिरात परवाना थकबाकी वसूल करण्याची कार्यपद्धती (1) जर अभिकरणाची इतर कोणत्याही प्रकारची शुल्क अथवा परवाना फी थकबाकी असल्यास व अभिकरण ते भरण्यास असमर्थ असल्यास अथवा टाळाटाळ करत असल्यास सदर शुल्काची वसुली अभिकरणाच्या मालमत्तेतून किंवा जप्ती करून वसूली करण्याचे अधिकार महानगरपालिका आयुक्तांचे असतील. (2) अशा अभिकरणास किंवा त्या संस्थेस कोणत्याही प्रकारची परवानगी अथवा नुतनीकरण देता येणार नाही, अशा थकबाकीदार अभिकरणाचे नाव काळ्या यादीत टाकण्यात येईल.

10.9 अनाधिकृत / परवानगी व्यपगत झालेले होर्डिंग निष्कासित करण्यासाठी होणारा प्रशासकिय खर्च/ प्रशासकिय शुल्क बाबत वेळोवेळी निर्णय घेण्यात येईल त्याप्रमाणे संबंधितांकडून वसुल करणेत येईल.

## 11. तक्रार निवारण यंत्रणा

11.1 तक्रार निवारण यंत्रणा स्थापने संदर्भात प्रत्येक मनपा/ नप मार्फत किमान एक टोल फ्री क्रमांक तसेच SMS द्वारे व व्हाट्सअप द्वारे तक्रार करण्यासाठी क्रमांक उपलब्ध करून देऊन त्याचप्रमाणे संकेतस्थळाद्वारे छायाचित्रासह तक्रार दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.

11.2 SMS, Grivience Portal, Toll Free No, लेखी व ऑनलाईन तक्रारीचे रजिस्टर ठेवण्यात येईल. सदर टोल फ्री क्रमांक, S.M.S किंवा व्हाट्सअप द्वारे प्राप्त तक्रारींची नोंद घेण्यासाठी एक नोंदवही ठेवण्यात येईल. त्या नोंदवही मध्ये तक्रार प्राप्त दिनांक, वेळ व त्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही यांची नोंद ठेवण्यात येईल.

11.3 तक्रारीस क्रमांक देऊन तक्रारदारास त्याची माहिती उपलब्ध करण्यात येईल.

11.4 या तक्रार निवारण यंत्रणेमध्ये कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेल्या तक्रारींची तसेच निनावी तक्रारी बाबतही त्वरित दखल घेऊन त्यावर कारवाई करण्यात येईल.

## 12. नागरिकांची समिती

12.1 महानगरपालिका स्तरावर प्रत्येक वार्ड निहाय एक नागरिकांची समिती स्थापन करण्यात येईल. या समितीने व्यापक जनजागृती कार्यक्रम हाती घ्यावा तसेच अनाधिकृत होर्डिंग, आकाश चिन्हे व जाहिराती याबाबत सतर्क राहून नोडल अधिकारी यांच्या लक्षात आणून देणेचे कामकाज पार पाडले जाईल.

12.2 समितीमध्ये शहरातील प्रमुख राजकीय पक्षांचे शहर अध्यक्ष, नामांकित सामाजिक अशासकिय नोंदणीकृत संस्थेचे अध्यक्ष / सचिव, पत्रकार यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात येईल. सदस्य सचिव म्हणून झोन / प्रभाग अधिकारी असतील.

12.3 समिती अनाधिकृत होर्डिंग बॅनर इ. वर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनास आवश्यकते सहकार्य करेल त्या समवेत या संदर्भात जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करील. समितीची महिन्यातुन किमान एक बैठक घेणेत येईल.

## 13. प्रसिद्धी साठी उपाययोजना

13.1 तक्रार संदर्भात टोल फ्री क्रमांक व इतर क्रमांक यांना व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. हे टोल फ्री क्रमांक संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावेत. तसेच मोठ्या सणांच्या पूर्वी या क्रमांकास वर्तमानपत्र व लोकल केबल नेटवर्क याद्वारे व्यापक प्रसिद्धी द्यावी.

13.2 मनपा झोन/ प्रभाग नोडल अधिकारी, तसेच वार्ड निहाय समिती यांना व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. नोडल अधिकाऱ्यांचा संपर्क क्रमांक तसेच कार्यालयीन पत्ता याबाबत मनपा कार्यालय, वार्ड कार्यालय, तहसील कार्यालय इत्यादी ठिकाणी प्रसिद्धी द्यावी.

13.3 मोठ्या सणांच्या पूर्वी ही प्रसिद्धी वर्तमानपत्र, तसेच लोकल केबल नेटवर्क, टेलिव्हिजन चॅनल्स यांद्वारे देण्यात यावे.

13.4 महानगरपालिका क्षेत्रात इतर प्राधिकरणाच्या जागेत अथवा खाजगी जागेत, शैक्षणिक संस्था, औद्योगिक संस्था व सामाजिक संस्था यांना स्वत:च्या जागेत बॅनर, बार्ड, होर्डिंग इ. लावणेसाठी मनपाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. जाहिरात फलक / होर्डींग्स लावताना संबंधित महानगरपालिका, परवानगी घेण्याबाबत व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.

## 14. मा. उच्च न्यायालय,मुंबई यांचे आदेश दि.31.01.2017 व इतर सर्व न्यायालय आदेशाचे उल्लंघन प्रकरणी संबधित अधिकारी यांची वैयक्तिक जबाबदारी व उत्तरदायित्व

14.1. सदर जाहिरात धोरण व कार्यपद्धती च्या प्रभावी अंबलबजावणी साठी महानगरपालिका उपायुक्त दर्जाचा अधिकारी शक्यतो जाहिरात व आकाशचिन्हे विभाग किंवा मालमत्ता विभाग किंवा अनाधिकृत बांधकाम अतिक्रमण निर्मूलन विभाग यांची मनपा शहरस्तरीय होर्डिंग -जाहिरात नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येईल.

14.2. वॉर्डस्तरीय होर्डिंग -जाहिरात नोडल अधिकारी म्हणून सहा. आयुक्त/ प्रभाग अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येईल.

14.3. सदर नोडल अधिकारी, सहा.नोडल अधिकारी यांचेसह अनाधिकृत बांधकाम अतिक्रमण निर्मूलन विभाग प्रमुख अनधिकृत बॅनर, पोस्टर्स, होर्डिंग्ज तात्काळ निष्कासन करण्यासाठी जबाबदार असतील.

14.4. सदर धोरण व कार्यपद्धती च्या प्रभावी अंमलबजावणी साठी सदर नोडल अधिकारी संबंधित तसेच उपायुक्त आणि सहाय्यक आयुक्त यांनी यासंदर्भात ज्यांना कारवाईचे आदेश दिले असतील असे सर्व अधिकारी, कर्मचारी सहाय्यक नोडल अधिकारी, कर्मचारी म्हणून त्यांचेवर सदर धोरण व कार्यपद्धतीची अंमलबजावण्याची जबाबदारी सोपवली आहे असे समजण्यात येईल, त्यांचेवर नोडल अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाचे विहित काल मर्यादित पालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्याबाबतची जबाबदारी संबंधितांवर निश्चित केली जाईल.

15. **निष्कासन कारवाई कार्यपद्धती** मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्रं.155/2011 मध्ये दिलेल्या आदेशानुसार संबंधित पोलिस स्टेशन कडून पोलिस बंदोबस्त उपलब्ध करून घेऊन अनाधिकृत पोस्टर, बॅनर काढण्याबाबत.

15.1. **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 245: जाहिरातीचे नियमन व नियंत्रण**

15.2. (1) आयुक्त लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही जमिनीच्या, इमारतीच्या भितीच्या जाहिराती फलकाच्या किंवा बांधकामाच्या मालकास किंवा भोगवटादारास अशा जमिनीवरील इमारतीवरील भिंतीवरील जाहिरात फलकावरील किंवा बांधकामावरील कोणतीही जाहिरात अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत खाली उतरविण्यासाठी किंवा काढून टाकण्याविषयी फर्मावू शकेल.

15.3. (२) अशा कालावधीत अशी जाहिरात खाली उतरविण्यात किंवा काढून टाकण्यात आली नाही तर आयुक्तास ती खाली उतरविण्याची किंवा काढून टाकण्याची व्यवस्था करता येईल व त्यासाठी वाजवी रीतीने झालेला खर्च अशा मालकाने किंवा व्यक्तीने दिला पाहिजे.

15.4. अर्जदार, कार्य अथवा प्रयोजन पूर्ण झाल्यानंतर लगेचच जाहिराती काढून टाकण्याची व्यवस्था करील, जो अवधी सामान्यत: तीन दिवसांपेक्षा अधिक असता कामा नये. तशी माहिती मिळाल्यानंतर, प्रतिभूती ठेवीची रक्कम कोणत्याही शर्तीचा भंग केल्याबद्दल समपहरण केलेली नसेल तर, परत करण्यात येईल.

15.5. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल PIL/155/2011 मध्ये दिलेल्या आदेशानुसार हत्यारी पोलिस बंदोबस्त उपलब्ध करून घेऊन अनाधिकृत जाहिरात बोर्ड, फ्लेक्स, बॅनर, होर्डिंग काढून टाकण्याची कारवाई करण्यात येईल.

15.6. परवाना मिळण्याच्या आधीच बेकायदेशीररित्या उभा केलेले जाहिरात फलक लावलेले होर्डिंग्ज, बॅनर्स त्वरित काढून टाकण्यात येतील.

15.7. महानगरपालिका, क्षेत्रातील अधिकृत पण नियमबाह्य आकाराच्या, उंचीच्या होडींगवरही तात्काळ निष्कासन कारवाई करणेत येईल.

15.8. कुठल्याही व्यक्तीच्या वाढदिवसानिमित्त किंवा कोणत्याही कार्यक्रमा निमित्त तसेच विविध सणांच्या पूर्वी लावले जाणारे अनधिकृत होर्डिंग हे वाढदिवसाच्या किंवा सणाच्या दिनांका पूर्वीच काढून घेण्यात येतील.

15.9. महानगरपालिका, क्षेत्रामध्ये तसेच अन्य प्राधिकरणांच्या जागेमध्ये (रेल्वे, इतर नागरी प्राधिकरणे, केंद्रशासीत प्राधिकरणे इ.) जाहिराती लावणेसाठी उभारण्यात आलेल्या होर्डींग्स, फ्लेक्स, बॅनर्स यांचे वेळोवेळी बांधकाम संरचना सुस्थिती प्रमाणपत्र सक्षम नोंदणीकृत संरचना अभियंता यांचेकडून सादर करणे बंधनकारक राहील. त्यानुसार धोकादायक होर्डींग्सबाबत नियमानुसार कारवाई करणेत येईल.

15.10. अनधिकृतरित्या उभारण्यात येणाऱ्या होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इ. मध्ये मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक किंवा इतर अविघटनशील पदार्थांचा वापर केला जात असल्याने निष्कासन कारवाईत सातत्य ठेवण्यात येईल.

15.11. महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, 1995 मधील तरतूदींचे नोडलअधिकारी, सहा. नोडल अधिकारी यांचेकडून पालन करण्यात येईल. विशेषत: कलम 3 व 5 मधील गुन्हे दाखल करणे व निष्कासन खर्च वसूल करणे बाबतच्या तरतुदींचे अवलोकन करून कार्यवाही करण्यात येईल.

15.12. मनपा क्षेत्रात विविध कामासाठी तसेच विविध सणांच्या दरम्यान तात्पुरते मंडप तसेच बूथ उभारले जातात. या मंडप किंवा बुथ उभारण्याची परवानगी देताना त्यावर कुठलेही अनाधिकृत होर्डिंग किंवा जाहिरात न लावण्याची अट टाकण्यात येईल. तसेच अशा प्रकारे उभारलेल्या मंडपावर अनाधिकृतपणे लावलेले होर्डिंग्ज, बॅनर्स त्वरित काढून टाकण्यात येतील.

15.13. अनधिकृत उभारण्यात आलेल्या होर्डींग्स, फ्लेक्स, बॅनर्स, पोस्टर्स इ. तपासणीकरीता आवश्यकतेनूसार शोध मोहिम राबविण्यात येईल .व अनधिकृत, धोकादायक होर्डींग्स, फ्लेक्स, बॅनर्स वर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. प्रभागस्तरीय नोडल अधिकारी तथा सहा. आयुक्त/ प्रभाग अधिकारी यांनी मुख्य स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता निरीक्षक यांचे मार्फत दैनंदिन सर्वेक्षण करून घेऊन शहरस्तरीय नोडल अधिकारी तथा उपायुक्त यांचे मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभाग प्रमुख यांचे समवेत आवश्यक यंत्रणा उपलब्ध करून घेऊन मा. उच्च न्यायालयाने आदेशामध्ये नमूद केलेप्रमाणे आवश्यकतेप्रमाणे हत्यारी पोलिस बंदोबस्त उपलब्ध करून घेऊन अनाधिकृत होर्डिंग, बॅनर, पोस्टर काढून टाकण्याची दैनंदिन कारवाई करणेत येईल.

15.14. अनाधिकृत जाहिरात बोर्ड, फ्लेक्स, बॅनर, होर्डिंग चे दंड आकारणी वसूल करणेत येईल.

15.15. मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल क्रं. 155/2011 मध्ये दिलेल्या आदेशानुसार मालमत्ता विरूपण कायद्याचे केले गेलेले उल्लंघन याबाबत मनपा/ नगरपालिका प्रशासन, कर्मचारी किंवा नागरिक यांच्या लेखी अथवा तोंडी तक्रारीवरून माहिती दिल्यानंतर स्थानिक पोलिस

स्टेशनकडे गुन्हा दाखल करण्याचे मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार कारवाई करण्यात येईल. अनधिकृत होर्डिंग वर कारवाई करताना डिजिटल स्वरूपात होर्डिंग्जचे फोटोग्राफ व व्हिडीओ रेकॉर्डीग करण्यात येईल. तसेच गरज असल्यास सदर बाबतीत पंचनामा करावा. तसेच सर्व केलेल्या कार्यवाहीचे सर्व आवश्यक दस्तावेज तयार करुन फोटोग्राफ व रेकॉर्डीग इत्यादी पुरावे म्हणून  जतन करण्यात येतील. तसेच त्यांच्या प्रती पोलिसांना गुन्हा दाखल करतेवेळी उपलब्ध करून देणेत येतील.

15.16. कार्यक्षेत्रातील अनधिकृत जाहिरात फलक / होर्डीग्स तात्काळ काढून टाकावेत व जबाबदार व्यक्तीकडून दंडाची रक्कम काटेकोरपणे वसूल करण्यात येईल. त्यांच्याविरूध्द महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम, 1995 मधील तरतुदीनुसार गुन्हे दाखल करण्यासाठी स्थानिक पोलिस ठाणे यांना पत्र देण्यात येईल.

15.17. भविष्यात होडींग कोसळण्याच्या घटना घडू नयेत, यासाठी महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिका क्षेत्राकरीता आकाश - चिन्हे आणि जाहिरात प्रदर्शनाचे नियमन व नियंत्रण नियमावली, 2022 ची दैनंदिनरित्या काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात येईल. अनाधिकृत जाहिरात बोर्ड, फ्लेक्स, बॅनर, होर्डिंग इ. आढळल्यास त्याची जबाबदारी ही शहरस्तरीय नोडल  अधिकारी तथा उपायुक्त सहा. आयुक्त / प्रभाग अधिकारी तसेच अनाधिकृत बांधकाम अतिक्रमण निर्मूलन विभाग प्रमुख यांचेवर राहील.

16. **मासिक अहवाल** मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या वरील सर्व निर्देशांच्या अनुषंगाने ज्या राजकीय पक्ष व त्यांचे कार्यकर्ते यांनी अनाधिकृत होर्डिंग लाऊन न्यायालयाच्या निर्देशांचा अवमान केला आहे, त्यांच्या नावाचा उल्लेख करून कार्यवाहीचा मासिक अहवाल राज्य शासनास शहरस्तरीय नोडल अधिकारी तथा उपायुक्त यांचेकडून सादर करण्यात येईल.

17. **आढावा**

17.1. आयुक्त व पोलीस नोडल अधिकारी यांचे सोबत प्रत्येक महिन्यात केलेल्या कारवाई संदर्भात एक आढावा बैठक घेण्यात यावी. मोठ्या सणांच्या काळात ही आढावा बैठक प्रत्येक आठवड्याला घेण्यात येईल.

17.2. अतिरिक्त आयुक्त/उपायुक्त/ सहा.आयुक्त व उपविभागीय पोलीस अधिकारी/नोडल पोलीस अधिकारी यांचे सोबत प्रत्येक महिन्यात केलेल्या कारवाई संदर्भात एक आढावा बैठक घेण्यात येईल.

18. **पुर्वीचे निर्णय अधिक्रमित** सदर धोरण व कार्यपध्दती अंमलात आणण्यास सक्षम प्राधिकारी यांची मान्यता झाल्यानंतर पूर्वीचे निर्णय अधिक्रमित -निष्पादित होतील.

19. **सुधारणा करण्याचे अधिकार** या धोरणात व कार्यपध्दतीमध्ये वेळोवेळी परिस्थितीनुरूप सुधारणा करण्याचे अधिकार मा. आयुक्तसो यांना असतील.

नमुना क (1)

[ नियम 25 (ग) पहा]

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 244, 245, महाराष्ट्र मालमत्ताच्या विरूपणास प्रतिबंध करण्याकरीता अधिनियम 1995)

परवाना क्रमांक –

मेसर्स----------------------------------------------------------------राहणार------------------------------ ---------------------------यांना,याव्दारे-----------------------------------------------------पासून----- -------------------------------------------------------पर्यंतच्या कालावधीसाठी उक्त अधिनियम तरतुदी महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश चिन्हे व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन व नियंत्रण) नियम, 2022 च्या मा. न्यायालय मुंबई कडील जनहीत याचीका क्र.155/2011 मधील निर्देश मनपाचे सुधारीत धोरण व कार्यपद्धती 2024 मधील अटी शर्ती तरतुदींच्या अनुपालन करण्याच्या अधीनतेने, खाली तपशिलवार दिल्याप्रमाणे आकाश-चिन्हे उभारण्यास प्राधिकार दिले आहेत.-

| आकाश चिन्हाचे स्वरूप | आकाश चिन्हाचे ठिकाण | आकाश चिन्हाचा आकार व क्षेत्र | प्रदर्शनाचा कालावधी | |
|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत |
| | | | | |
| | | | | |

अर्जदाराने महानगरपालिकेने विहित केलेल्या दराने चलन क्रमांक------------------------------ दिनांक---------/--------/20------- व्दारे रूपये-----------------------------------इतके शुल्क प्रदान केले आहे.

दिनांक - / /

सक्षम प्राधिकारी

महानगरपालिका

नमुना अ

अर्जाचा नमुना

(नियम 17 पहा)

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 244 पहा)

1. अर्जदाराचे नाव :- ……………………………………………………………………………………………………

2. अधिकरणाचे नाव :- ……………………………………………………………………………………………………

3. दर्जा :- खाजगी मालकीची संस्था / कंपनी / धर्मादाय न्यास /इतर.

4. पत्ता :- ……………………………………………………………………………………………………

……………………………………………………………………………………………………

……………………………………………………………………………………………………

दूरध्वनी क्र. फॅक्स क्र.

5. ज्यासाठी अर्ज केला आहे त्या जाहिरातीचे माध्यम :- प्रकाशित/अप्रकाशित

6. जाहिरातीचा प्रकार :-तात्पुरती / तात्पुरती नसलेली

7. अर्ज केलेल्या जाहिरातीचे स्वरूप :-

8. मोफत निशाण प्रदर्शित करण्यासाठी अर्ज केला आहे का ? :- होय / नाही

होय असल्यास,

क) विद्याविषयक/धार्मिक/ सामाजि जनजागृती /आरोग्य/ राजकीय: अतर.

ख)कालावधी :- ………… पासून …………. पर्यंत.

ग) ठिकाण :- एक /अनेक

अनेक असल्यास;-

(एक) ठिकाणांचे क्रमांक :- …………………………………………………

घ) मोफत निशाणावरील संदेशाचा मजकूर :- …………………………………………………

ड) तुम्हाला जो नागरी संदेश द्यायला आहे, त्या नागरी संदेशाचा प्रवर्ग दर्शवा :-

च) न्यासाच्या नोंदणीची छायाचित्रप्रत सोबत जोडली आहे का ? :- होय / नाही

9. मोजमाप :-

| मोजमाप | चौ. फुट | चौरस मिटर |
|---|---|---|
| लांबी | | |
| रुंदी | | |
| एकूण क्षेत्र | | |
| उंची | | |

10. स्थान निश्चयन :-

- रस्त्याचे नाव :- ..........................................................................................................
- रस्त्यांची रूंदी :- ........................................................................................................
- 25 मीटरच्या आतिल असलेल्या जाहिरात फ लकांचा क्रमांक :-
- रस्त्याच्या प्रत्येक बाजूला 25 मीटरच्या आत असणाऱ्या वृक्षांची संख्या :-
- वृक्ष तोडण्याची आवश्यकता आहे किंवा कसे ?

11. जमीन मालकाचे नाव :-

12. जमीन मालकाचे ना - हरकत प्रमाणपत्र सादर केले आहे का?:- होय /नाही.

13. नियम 17 (ख) व सुधारीत धोरण ( अनुक्रमांक 5) नुसार दस्तऐवज सादर करण्यात आले आहेत किंवा कसे ? :- होय /नाही.

मी, वर दिलेल्या महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश-चिन्हे व जाहिरात प्रदर्शन नियमन व नियंत्रण) नियम, 2022 च्या तरतुदी काळजीपूर्वक वाचल्या आहेत आणि सर्व शर्तीचे अनुपालन केले आहे. मी दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास, कायद्यानुसार उक्त नमूद अधिनियम नियम धोरण कार्यपद्धती मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश यामधील तरतुदीनुसार विहित करण्यात येईल अशा दंडात्मक/ फौजदारी कार्यवाहीसाठी मी पात्र असेन असे मी मान्य करतो.

अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक :-

पदनाम

नमुना - ब

(नियम 23 पहा)

होर्डिंगसाठी नुतनीकरणाच्या अर्जाचा नमुना

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | अर्जदारचे नाव व पत्ता | : | |
| 2 | जाहिरातीचा सविस्तर तपशिल | : | |
| 3 | ठिकाण | : | |
| 4 | मंजुर आकार व प्रकार | : | |
| 5 | रोषणाई केलेले (प्रकाशित)<br>रोषणाई केलेले (अप्रकाशित) | : | |
| 6 | मागील नूतनीकरण कोणत्या दिनांका पर्यंत केले आहे? | : | |
| 7 | नूतनीकरणाचा पुढील कालावधी | : | |
| 8 | मंजूर जाहिरात फलकाच्या पुढील नूतनीकरणासाठी मालमत्ता धारकाने ना - हरकत प्रमाणपत्र दिले आहे किंवा कसे? | : | |

* नियम 23 (ख) सुधारीत धोरण (अनुक्रमांक 5) नुसार दस्तऐवज सादर करण्यात आले आहेत/ किंवा कसे.

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

20. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक -अ - मध्य उप-विभाग, मे 9, 2022/वैशाख 19, शके 1944 केवळ कार्यालयीन वापरासाठी :-

महाराष्ट्र महानगरपालिका (आकाश-चिन्हे व जाहिरात प्रदर्शन नियमन व नियंत्रण) नियम, 2022 च्या नियम 28 अनुसार अर्ज परिपूर्ण आहे किंवा कसे ? :-

(क) नोंदणी क्रमांक :- ... ..................................................................................

(ख) संस्करण शुल्क :- ..................................................................................

(ग) ठेव :- ..................................................................................

(घ) अर्ज मिळाल्यास दिनांक :- ..................................................................................

(ड) बोलवण्याचा दिनांक :- ..................................................................................

सक्षम प्राधिकाऱ्याची सही